आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२७ मे २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- संपूर्ण देशात यंदा जून ते सप्टेंबरदरम्यान सामान्य पावसाचा हवामान विभागाचा अंदाज
- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत सुमारे ९६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण / कोकण विभागाचा निकाल ९९ टक्क्यापेक्षा जास्त
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं ७६ हजारांचा टप्पा ओलांडला, मात्र दिवसअखेर घसरण
- राजकोट इथल्या गेमिंग झोन आग प्रकरणी गुजरात सरकारकडून सात अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

**आणि**

- रेमाल चक्रीवादळामुळे बांगला देशात १०, तर पश्चिम बंगालमध्ये चार जणांचा मृत्यू, बांगला देशात ३० हजारापेक्षा जास्त घरं उद्ध्वस्त

**<><><><><>**

संपूर्ण देशात यंदाच्या पावसाळ्यात जून ते सप्टेंबरदरम्यान सामान्य पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. यंदा देशात ४ टक्क्यांच्या तफावतीसह १०६ टक्के पाऊस पडेल, अशी माहिती हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी नैऋत्य मौसमी पावसासंबंधीचा दुसऱ्या टप्प्यातला अंदाज प्रकाशित करताना दिली. नैऋत्य मौसमी पाऊस मध्य आणि दक्षिणी द्वीपकल्पीय भागात सामान्य पातळीपेक्षा जास्त, वायव्य भागात सामान्य आणि ईशान्य भारतात सामान्य पातळीपेक्षा कमी पडेल, असा अंदाज महापात्रा यांनी वर्तवला. जून महिन्यातला पाऊस सामान्य राहील, असंही त्यांनी सांगितलं.

येत्या पाच दिवसांमध्ये नैऋत्य मौसमी वाऱ्यांचं केरळमध्ये आगमन होण्याच्या दृष्टीनं अनुकूल असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं मार्चमधे घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र, म्हणजेच इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. यंदा या परीक्षेत ९५ पूर्णांक  ८१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

राज्यात मुलींची उत्तीर्ण होण्याची  टक्केवारी ९७ पूर्णांक २१ टक्के इतकी आहे, तर ९४ पूर्णांक ५६ टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत.

यंदा कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजे ९९ पूर्णांक १ टक्के लागला असून मुंबई विभागाचा निकाल ९५ पूर्णांक ८३ टक्के इतका आहे.

<><><><><>

आत्मनिर्भर भारत धोरणाचं उद्दिष्ट देशातल्या प्रतिभेला प्रोत्साहन देणं आणि रोजगारक्षमता वाढवणं आहे, असं प्रधानमंत्री भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी म्हणाले. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. सरकारनं थेट लाभ हस्तांतराच्या माध्यमातून आतापर्यंत ३८ लाख कोटी रुपये लोकांना दिल्याचंही मोदी यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडी, इंडिया आघाडी आणि इतर राजकीय पक्षांचे नेते बिहारमध्ये प्रचाराच्या रिंगणात उतरले आहेत आणि जागोजागी प्रचारसभा घेत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज पटणा साहिब मतदारसंघातल्या खुस्रूपूर इथं प्रचारसभेला संबोधित केलं. दर वर्षी दोन कोटी रोजगार देण्यात एनडीए

सरकारला अपयश आलं असल्याचं सांगून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी याही मुद्द्याचं उत्तर त्यांच्या सरकारच्या प्रगतीपुस्तकात द्यावं, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. नोटाबंदी आणि जीएसटीमुळे सरकारी आणि खासगी क्षेत्र, तसंच लष्करात रोजगाराच्या वाटा बंद झाल्याची टीका त्यांनी केली. पालीगंज आणि अर्राह इथंही राहुल गांधी यांच्या प्रचारसभा झाल्या.

राष्ट्रीय जनता दल नेते तेजस्वी यादव यांनी घोशी इथल्या प्रचारसभेत भाजपावर निशाणा साधला. भाजपाला आरक्षण रद्द करायचं आहे आणि राज्यघटना संपवून टाकायची आहे. ही लोकसभा निवडणूक म्हणजे लोकशाहीला वाचवण्याची राजकीय लढाई आहे, असं यादव यांनी सांगितलं.

संयुक्त जनता दलाचे नेते आणि बिहारचे मुख्यमंत्री नितेश कुमार यांनीही नालंदा इथं प्रचारसभा घेतली. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही गाझीपूर आणि चांदौली इथं प्रचारसभांना संबोधित केलं.

**<><><><><>**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ४०० पेक्षा जास्त जागा मिळतील आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पुन्हा एकदा प्रधानमंत्रीपदी येतील, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला आहे. या निकालानंतर राहुल गांधी पत्रकार परिषद घेतील आणि इंडिया आघाडीच्या पराभवासाठी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन जबाबदार असल्याचा दावा करतील, असं भाकीतही त्यांनी केलं.

या निकालाचं खापर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यावर फोडून त्यांच्याकडून पदाचा राजीनामा घेतला जाईल, असा दावा शहा यांनी उत्तर

प्रदेशच्या कुशीनगर इथल्या प्रचारसभेत केला. याशिवाय शहा यांच्या प्रचारसभा बलिया आणि वाराणसी इथंही झाल्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात लोकांनी देश बदलताना पाहिला आहे. २०१४ पूर्वीचा भारत आणि २०२४चा भारत यात मोठा फरक आहे, असं प्रतिपादन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मऊ इथल्या प्रचारसभेत केलं.

भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आज प्रधानमंत्री मोदी यांच्या प्रचारासाठी वाराणसी इथं सभा घेतली. प्रधानमंत्री मोदी आणि भाजपा सत्तेत असेपर्यंत धर्माधारित आरक्षण मिळणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांची प्रचारसभा मनेर इथं झाली.

**<><><><><>**

आरक्षणाच्या मुद्द्यावरून इंडिया आघाडी देशाची दिशाभूल करत असल्याचा आरोप भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज झारखंडमधे राजमहल इथल्या प्रचारसभेत केला. देशात आजवर लागू असलेलं आरक्षण यापुढेही सुरू राहील, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीनं आज दिवसभराच्या व्यवहारात आजवरच्या उच्चांकी पातळीला स्पर्श केला. आज दुपारी सेन्सेक्सनं ७६ हजारांची पातळी ओलांडली होती. तर निफ्टी २३ हजाराची पातळी ओलांडून, २३ हजार १०७ अंकांपर्यंत पोहोचला होता.

मात्र दिवसअखेर, शुक्रवारच्या तुलनेत सेनेक्स १९ अंकांची घसरण नोंदवत ७५ हजार ३९० अंकांवर बंद झाला तर निफ्टी २४ अंकांनी घसरून २२ हजार ९३२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

गुजरातच्या राजकोट इथल्या गेमिंग झोन आग प्रकरणी विशेष तपास पथकाचा अहवाल तीन दिवसांत येणं अपेक्षित असल्याचं गुजरात सरकारनं आज गुजरात उच्च न्यायालयाला सांगितलं. अग्नी सुरक्षा प्रमाणपत्र आणि इतर अत्यावश्यक परवानग्या नसतानाही गेल्या दोन वर्षांपासून राजकोट शहरात सुरू असलेल्या दोन गेमिंग झोन्सवरून गुजरात उच्च न्यायालयानं राजकोट महापालिका आणि राज्य सरकारवर ताशेरे ओढले. या प्रकरणाची न्यायालयानं स्वतःहून दखल घेतली होती. याची सुनावणी न्यायमूर्ती बिरेन वैष्णव आणि न्यायमूर्ती देवान देसाई यांच्या खंडपीठासमोर आज पार पडली.

दरम्यान, या प्रकरणी गुजरात सरकारनं सात अधिकाऱ्यांवर कामात दुर्लक्ष आणि विलंब केल्याबद्दल आज निलंबनाची कारवाई केली. तसंच राजकोट शहर पोलीस आयुक्त आणि महापालिका आयुक्तांच्या बदलीचे आदेश दिले. शनिवारी झालेल्या या दुर्घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला आहे.

**<><><><><>**

रेमाल चक्रीवादळामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये बांगलादेशात १०, तर पश्चिम बंगालमध्ये चार जणांचा मृत्यू झाला आहे. बंगालमध्ये विजेच्या तारांची दुरुस्ती करताना विजेचा झटका लागून एका इसमाचा मृत्यू झाला, तर मोडकळीला आलेल्या एका इमारतीची भिंत कोसळून आणखी दोघांचा मृत्यू झाला. २४ परगणा जिल्ह्याच्या दक्षिण भागातल्या सागर बेटसमूहातल्या मौसुनी बेटावर वादळी

वाऱ्यामुळे झाड अंगावर पडून एक महिला ठार झाली. याशिवाय मातीची काही घरंही खचली.

या नैसर्गिक आपत्तीत राज्याच्या सामान्य नागरिकांसाठी राज्य सरकार शक्य ते सगळं करत असल्याचं आश्वासन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिलं. चक्रीवादळ धडकण्यापूर्वी सुमारे दोन लाख नागरिकांना चौदाशे छावण्यांमध्ये हलवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान, या चक्रीवादळामुळे बदललेलं पश्चिम बंगालमधलं वातावरण हळूहळू पूर्वदावर येईल, अशी माहिती हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहापात्रा यांनी नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना दिली.

या चक्रीवादळामुळे बांगलादेशात ३० हजारापेक्षा जास्त घरं उद्ध्वस्त झाली. हे चक्रीवादळ काल रात्री खेपूपारा आणि पश्चिम बंगालच्या सागर बेटादरम्यान किनारपट्टीवर धडकलं. त्यानंतर त्याची तीव्रता कमी झाली.

**<><><><><>**

उझबेकिस्तानमधे ताश्कंद इथल्या अशियाई चॅम्पियन स्पर्धेत भारताच्या दीपा कर्माकरनं महिलांच्या वॉल्टमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. दीपानं १३ पूर्णांक ५६ शतांश गुणांसह हा विजय मिळवला आहे. या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती पहिलीच भारतीय महिला खेळाडू ठरली आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमधल्या प्रवेशासाठी बँकॉकमध्ये सुरु असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध पात्रता स्पर्धेत भारताच्या अंकुशिता बोरो हीनं महिलांच्या ६० किलो वजनी गटात दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. अंकुशिता हिनं मंगोलीयाच्या नमुन मोनखोर

हिच्यावर ४-१ अशी मात केली. पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात मात्र भारताच्या अभिमन्यू लॉरा याचं आव्हान संपुष्टात आलं. त्याला आयर्लंडच्या केलीन कॅसेडी यानं ५ - ० असं हरवलं.

**//<><><><><>//**